# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/२०१५/स्वागत /मवि-१ /10528 दिनांक-१७/१०/२०१५

19 OCT 2015

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

२) विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

**विषय :- उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यालये, अकृषी विद्यापीठे, शैक्षणिक संस्था येथे मान्यवर व्यक्ती आणि अधिकारी यांच्या भेटी किंवा समारंभाच्या वेळी त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्याऐवजी पुस्तक देऊन करण्याबाबत.**

**संदर्भ** :- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण- ११११ / (प्र.क्र. १४६/१५) / समन्वय , दि.१५.१०.२०१५

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. (प्रत संलग्न ) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यालये, अकृषी विद्यापीठे, शैक्षणिक संस्था येथे मान्यवर व्यक्ती / अधिकारी व इतर संबंधित इत्यादी कामकाजाच्या निमित्ताने भेटी देत असतात. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने दि. १५ ऑक्टोबर हा जन्मदिन " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात आला.

या पाश्वभूमीवर वाचन संस्कृती व वाचन प्रेरणा वाढीस लागण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यालये, अकृषी विद्यापीठे, शैक्षणिक संस्था येथे मान्यवर व्यक्ती आणि अधिकारी यांच्या भेटी व समारंभावेळी त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्याऐवजी पुस्तक देऊन करण्याबाबत शासन परिपत्रान्वये निर्देशित करण्यात आलेले आहे.

उपरोक्त शासन परिपत्रकात दिलेल्या सूचनेनुसार आपल्या विद्यापीठांत त्याचबरोबर आपल्या अधिनस्त शैक्षणिक संस्था / महाविद्यालये यांना मान्यवर व्यक्ती आणि अधिकारी यांच्या भेटी व समारंभावेळी त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्याऐवजी पुस्तक देऊन करण्याबाबत सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

**(डॉ.व्ही. आर. मोरे )**
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Fr 3 Feb 2015/Letter feb 15/letter

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यालये, अकृषी विद्यापीठे, शैक्षणिक संस्था येथे मान्यवर व्यक्ती आणि अधिकारी यांच्या भेटी किंवा समारंभाच्यावेळी त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्याऐवजी पुस्तक देऊन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण -१११९/(प्र.क्र.१४६/१५)/समन्वय**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: १५ ऑक्टोबर, २०१५.

**शासन परिपत्रक -**

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यालये, अकृषी विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, महाविद्यालये येथे मान्यवर व्यक्ती/अधिकारी व इतर संबंधीत इत्यादी कामकाजाच्या निमित्ताने भेटी देत असतात. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देणाऱ्या मान्यवर व्यक्ती आणि अधिकारी यांचे सर्वसाधारणपणे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले जाते. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या अनुषंगाने त्यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्मदिन, " वाचन प्रेरणा दिवस " म्हणून साजरा करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर एकूण वाचन संस्कृती व वाचन प्रेरणा वाढीस लागावी यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत कार्यालये, अकृषी विद्यापीठे, शैक्षणिक संस्था येथे मान्यवर व्यक्ती आणि अधिकारी यांच्या भेटी किंवा समारंभाच्यावेळी त्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्याऐवजी विविध विषयांवरील पुस्तके देऊन करण्यात यावे.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१५१०१५१२३०११९२०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kamini R Pilankar

Digitally signed by Kamini R Pilankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=791d70f75a8bfaa8349786f02d71cad4fb9d1999ea0d92d63dcf5de198d4f817, cn=Kamini R Pilankar
Date: 2015.10.15 17:20:11 +05'30'

Fw u-a.pl.
16/10

**( का.रा.पिळणकर )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

परिपत्रक निर्गमित
16/10